दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**आजचे पंचांग**

दिनांक : १० सप्टेंबर २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : चतुर्दशी तिथी (सकाळी १०:३३ पर्यंत) त्यानंतर अमावस्या तिथी नक्षत्र : मघा नक्षत्र (दुपारी ०२:०३ पर्यंत) त्यानंतर पूर्वा फाल्गुनी नक्षत्र योग : सिद्ध योग (सायंकाळी ०७:१७ पर्यंत) त्यानंतर साध्य योग करण : शकुनी करण (सकाळी १०:३३ पर्यंत) त्यानंतर चतुष्पाद करण

**अश्लील नृत्याला परवानगी देऊ नका**

**पुणे :** ज्या नृत्यांगना अश्लील नृत्य सादर करतात, अशा कार्यक्रमांना प्रशासनाने परवानगी देऊ नये. मात्र, कष्टाने आपली कला जोपासून प्रामाणिकपणे नृत्य सादर करणाऱ्या कलावंतांना कार्यक्रमाची परवानगी नाकारू नये, अशी भूमिका नृत्यांगना ऐश्वर्या जाधव लातूरकर यांनी व्यक्त केली. त्या म्हणाल्या, ''आम्ही कलाकार म्हणून मेहनत करून कार्यक्रम सादर करतो. आमचे कार्यक्रम झाले नाहीत, तर आमची आणि आमच्या सहकलाकारांची उपजीविका कशी चालणार? कला सादर करून सन्मानाने जगण्याचा आम्हाला हक्क आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरूवार, दि. १० सप्टेंबर २०२६ वर्ष - १ अंक - ३४३ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

**सारांश वृत्त**

## पिंपळे निलखमध्ये ‘लव्ह मॅरेज’च्या रागातून जीवघेणा हल्ला; पिस्तुलातून गोळीबार करत ३ तोळ्यांची सोन्याची चेन हिसकावली!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

प्रेमविवाहाचा जुना राग मनात धरून एका हॉटेल व्यावसायिकावर लोखंडी कोयत्याने प्राणघातक हल्ला चढवत, पिस्तुलातून गोळीबार केल्याची थरारक घटना पिंपळे निलख येथे घडली आहे. या हल्ल्यात फिर्यादीसह त्यांना वाचवण्यासाठी धावून आलेले दोन भाऊ गंभीर जखमी झाले असून, आरोपींनी फिर्यादीच्या गळ्यातील ३ तोळ्यांची सोन्याची चेन जबरदस्तीने हिसकावून पोबारा केला. सांगवी पोलीस ठाण्यात याप्रकरणी चौघांवर खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी आणि आर्म्स ॲक्टसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

फिर्यादी अमोल अण्णासाहेब वीर (वय ३३, रा. संध्यानगरी बिल्डींग, विशालनगर, पिंपळे निलख) यांचा हॉटेलचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांनी सायली लांडगे हिच्याशी प्रेमविवाह केला होता. या लग्नाचा राग मनात धरून सायलीचे चुलते यांच्या सांगण्यावरून, आरोपी संदीप तानाजी लांडगे, रोहन अर्जुन लांडगे, हर्षद काळूराम लांडगे आणि अनिल पांडुरंग लांडगे (सर्व रा. पांडुरंग कृपा बिल्डींग, कासारवाडी, पुणे) यांनी कट रचला. ८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास, आरोपी संध्यानगरी बिल्डींगच्या पार्किंगमध्ये आले. फिर्यादीच्या चुलत मेहुण्याने शिवीगाळ करत ''आमच्या बहिणीसोबत लव्ह मॅरेज करतो का? आज तुला जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपी क्रमांक १ व २ यांनी सोबत आणलेल्या धारदार लोखंडी कोयत्याने अमोल यांच्या डोक्यावर व हातावर सपासप वार करून त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पाडले.

# शिक्षणातही भेदभाव? एसटी विद्यार्थ्यांना वेगळे का?


## जात वैधता प्रमाणपत्रासाठी इतरांना तीन महिन्यांची मुदतवाढ, पण आदिवासी विद्यार्थ्यांना वगळले; मुंबई उच्च न्यायालयाचा सरकारला दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

शिक्षणाच्या क्षेत्रात समान संधी, समान वागणूक आणि सामाजिक न्यायाची भाषा करणाऱ्या सरकारच्या निर्णयांवरच आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी इतर आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तीन महिन्यांची मुदतवाढ द्यायची; मात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्याच सवलतीपासून वंचित ठेवायचे, असा निर्णय सरकारने का घेतला? हा केवळ प्रशासकीय निर्णय आहे की आरक्षणाच्या लाभार्थ्यांमध्येच भेदभाव करणारी मानसिकता? मुंबई उच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे या प्रश्नांना अधिक धार आली आहे.

दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रकानुसार इतर आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. मात्र, या सवलतीत एसटी विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला नाही. जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया अनेकदा विद्यार्थ्यांच्या हातात नसते. कागदपत्रांची पडताळणी, समित्यांमधील



प्रक्रिया आणि प्रशासकीय विलंब यामुळे प्रमाणपत्र मिळण्यास वेळ लागू शकतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनाच शिक्षेच्या कठड्यात उभे करणे कितपत न्याय्य?

याच मुद्द्यावर दाखल याचिकेच्या सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने एसटी विद्यार्थ्यांना या मुदतवाढीपासून वगळणे प्रथमदर्शनी भेदभावपूर्ण असल्याचे निरीक्षण नोंदवले. समान परिस्थितीत असलेल्या विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या आरक्षित प्रवर्गाच्या आधारे वेगवेगळी वागणूक देता येईल का, हा मूलभूत प्रश्नच न्यायालयाने उपस्थित केला आहे.

सरकारने विद्यार्थ्यांसाठी नियम बनवावेत, पण ते नियम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर गदा आणणारे ठरू नयेत. विशेषतः सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हे पुढे जाण्याचे सर्वात महत्त्वाचे माध्यम आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रशासकीय प्रक्रियेत अडकवून त्यांची प्रवेशाची, शिष्यवृत्तीची किंवा पुढील शिक्षणाची संधी धोक्यात आणली तर सामाजिक न्यायाच्या घोषणांचा अर्थ काय उरतो?

प्रश्न केवळ तीन महिन्यांच्या मुदतवाढीचा नाही; प्रश्न सरकारच्या निर्णयप्रक्रियेतील समानतेचा आहे. एकाच प्रकारची अडचण असताना एका आरक्षित प्रवर्गाला दिलासा आणि दुसऱ्याला नकार देण्यामागे नेमके कोणते तर्कशास्त्र होते? संबंधित विभागाने एसटी विद्यार्थ्यांना वेगळे का केले? निर्णय घेण्यापूर्वी त्याच्या घटनात्मक आणि सामाजिक परिणामांचा विचार झाला होता का?

उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया प्रलंबित असलेल्या एसटी विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र सरकारने याकडे केवळ न्यायालयीन आदेश म्हणून पाहण्याऐवजी आपल्या धोरणनिर्मितीची आत्मपरीक्षा म्हणून पाहणे गरजेचे आहे.

कारण शिक्षणाच्या दारातच जर समानतेचा नियम वेगवेगळ्या मापाने लागू केला जात असेल, तर ‘सबका साथ, सबका विकास’ची भाषा विद्यार्थ्यांच्या अनुभवात कशी उतरवणार? न्यायालयाने सरकारला आरसा दाखवला आहे; आता त्या आरशात दिसणाऱ्या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यायची आहेत.

## राम मंदिराच्या कथित गैरव्यवहाराची सावली; आता मंदिरांच्या पैशांवर न्यायालयाचा पहारा!

### रिअल-टाइम मॉनिटरिंग, छेडछाड न होणाऱ्या पावत्या आणि कठोर ऑडिटचे कर्नाटक हायकोर्टाचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बंगळुरू : प्रतिनिधी

धार्मिक श्रद्धेच्या नावाने भाविकांकडून जमा होणाऱ्या पैशांचा हिशेब नेमका कुठे जातो, हा प्रश्न आता केवळ भाविकांचा राहिलेला नाही; तो न्यायव्यवस्थेच्या दारातही पोहोचला आहे. मंदिरांच्या निधीच्या गैरवापराबाबतच्या प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्यातील हिंदू धार्मिक संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनासाठी कठोर निर्देश दिल्याने मंदिरांच्या आर्थिक कारभारातील पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

न्यायमूर्ती सूरज गोविंदराज यांच्या एकलपीठाने मंदिराच्या निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्याची बडतर्फी कायम ठेवली. त्याचवेळी मंदिरांमधील आर्थिक व्यवहारांवर अधिक काटेकोर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यापक व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले.

भाविकांच्या देणग्या, विविध शुल्क आणि इतर आर्थिक व्यवहारांचे रिअल-टाइम मॉनिटरिंग, फेरफार करता न येणाऱ्या पावत्या, नियमित लेखापरीक्षण आणि आर्थिक नोंदींचे योग्य जतन यावर न्यायालयाने भर दिला आहे. म्हणजेच श्रद्धेच्या नावाने जमा होणाऱ्या प्रत्येक रुपयाचा मागोवा घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेण्याची वेळ आली आहे.

हा निर्णय एका कर्मचाऱ्याच्या गैरव्यवहारापुरता मर्यादित नाही. मंदिरांचा कारभार ‘देवाचा पैसा’ म्हणून प्रश्नांच्या पलीकडे ठेवता येणार नाही, हा त्यातून स्पष्ट होणारा महत्त्वाचा संदेश आहे.

अयोध्येतील राम मंदिराशी संबंधित निधी व आर्थिक व्यवहारांबाबत वेळोवेळी उपस्थित झालेल्या आरोप-प्रतिआरोपांच्या पार्श्वभूमीवर मंदिरांच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबतचा हा मुद्दा अधिक संवेदनशील ठरतो. मात्र, राम मंदिरातील कोणतेही आरोप सिद्ध झाले आहेत असे गृहीत धरून देशातील सर्व मंदिरांना संशयाच्या चौकटीत उभे करणे योग्य ठरणार नाही. त्याऐवजी या घटनांनी एक व्यापक प्रश्न उपस्थित केला आहेधार्मिक संस्था कोणत्याही असोत, भाविकांच्या पैशांचा हिशेब पारदर्शक असायला नको का?

## पार्थ पवारांना आरोपी का केले नाही?

### मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी हायकोर्टाचा पोलिसांना सवाल; पोलीस महासंचालकांसह तपास अधिकाऱ्यांना उत्तर देण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

तब्बल १,८०० कोटी रुपयांच्या बहुचर्चित मुंढवा जमीन खरेदी गैरव्यवहारप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांच्या भूमिकेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पार्थ पवारांना आरोपी का करण्यात आले नाही? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना केला आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपासावरही आता न्यायालयीन लक्ष केंद्रित झाले आहे.

मुंढवा जमीन व्यवहाराची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या विकास खारगे समितीने तब्बल ४ हजार ३९२ पानांचा अहवाल विधिमंडळात सादर केला होता. समितीने कोणालाही स्पष्टपणे क्लीन चिट दिलेली नसून, अनेक अधिकारी आणि संबंधित व्यक्तींवर कारवाईची शिफारस केली आहे. मात्र, पार्थ पवार यांच्यावर कारवाईबाबत अहवालात थेट उल्लेख नसल्याने त्यांच्या भूमिकेबाबतचा प्रश्न कायम राहिला होता.

याच पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी झाली. न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही आणि त्यांना आरोपी का करण्यात आले नाही, अशी विचारणा तपास यंत्रणेला केली. या प्रश्नाचे उत्तर पोलीस महासंचालक आणि संबंधित तपास अधिकाऱ्यांनी द्यावे, असे न्यायालयाने निर्देश दिले आहेत. प्रकरणाची पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

दरम्यान, खारगे समितीने या प्रकरणी सात बैठका घेतल्या असून अहवाल सादर करण्यासाठी तीन वेळा मुदतवाढ घेण्यात आली होती. संबंधित तहसीलदार आणि सहायक दुय्यम निबंधक यांच्या बडतर्फीची शिफारसही समितीने केली आहे.

समितीने भविष्यातील फौजदारी तपासात आणखी व्यक्तींचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे नमूद केले आहे.

## डॉक्टर वाढले तर उपचार स्वस्त होतील का?

### "Essentiality Certificate'साठी पर्यावरण मंजुरीची पूर्वअट नको; मद्रास हायकोर्टाच्या निर्णयामुळे वैद्यकीय महाविद्यालयांना मार्ग मोकळापण रुग्णांच्या खिशाला खरोखर दिलासा मिळणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चेन्नई । प्रतिनिधी

देशात वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार झाला, नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली आणि डॉक्टरांची संख्या वाढली, तर उपचारांचा खर्च कमी होईल का? हा प्रश्न आता पुन्हा चर्चेत आला आहे. वैद्यकीय संस्था सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या "Essentiality Certificate'साठी पर्यावरण मंजुरी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी अनिवार्य नसल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे.

न्यायालयाने Essentiality Certificate आणि पर्यावरणीय मंजुरी या दोन स्वतंत्र वैधानिक प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे वैद्यकीय संस्था सुरू करण्याच्या प्राथमिक टप्प्यावर पर्यावरणीय मंजुरीची कागदपत्रे मागून प्रक्रिया लांबवता येणार नाही, अशी भूमिका न्यायालयाने घेतली आहे. या निर्णयामुळे नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि आरोग्य संस्था सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती मिळू शकते. परिणामी वैद्यकीय शिक्षणाच्या जागा वाढणे, डॉक्टरांची उपलब्धता वाढणे आणि आरोग्यसेवेतील स्पर्धा वाढणे शक्य आहे. पण इथेच खरा प्रश्न सुरू होतोडॉक्टर वाढले म्हणून उपचार स्वस्त होणार आहेत का? आज सर्वसामान्य कुटुंबाच्या अर्थसंकल्पाला सर्वाधिक हादरा देणाऱ्या खर्चांमध्ये आरोग्यसेवेचा समावेश होतो. डॉक्टरांची संख्या वाढली तरी औषधे, तपासण्या, रुग्णालयातील बेड, शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपकरणांचा खर्च वाढत राहिला, तर केवळ डॉक्टरांची उपलब्धता हा रुग्णांसाठी पुरेसा दिलासा ठरणार नाही. नवीन वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी देताना गुणवत्ता, शुल्क नियंत्रण, ग्रामीण भागातील डॉक्टरांची उपलब्धता आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची क्षमता यांचाही विचार करावा लागेल. मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय प्रक्रियेतील अडथळे कमी करणारा आहे; मात्र सरकारसमोरचे पुढचे आव्हान अधिक मोठे आहे.डॉक्टरांची संख्या वाढवण्यापासून उपचार सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यापर्यंतचा प्रवास कोण पूर्ण करणार?

कारण रुग्णाला शेवटी डॉक्टर किती आहेत यापेक्षा ‘उपचार परवडतात का?’ हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

## भाजपच्या तिजोरीत देणग्यांचा पूर; सामान्यांच्या खिशात मात्र रिकामेपण!

### १,४७२.८ कोटींच्या देणग्या जमा; निवडणुकीत कोट्यवधींचा खर्च महागाईच्या कात्रीत अडकलेल्या जनतेचा सवाल, ‘आमच्यासाठी पैसा कधी?’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

एका बाजूला देशातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या तिजोरीत देणग्यांचा ओघ सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकाला रोजच्या गरजा भागवण्यासाठी वाढत्या खर्चाशी झुंजावे लागत आहे. भाजपला पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांच्या मागील टप्प्यात तब्बल १,४७२.८ कोटी रुपयांची देणगी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राजकारणातील पैसा आणि सामान्यांच्या आर्थिक वास्तवातील दरी पुन्हा चर्चेत आली आहे.

निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या विवरणपत्रांनुसार, १५ मार्च २०२६ रोजी भाजपच्या खात्यात ६,७२२.६ कोटी रुपये शिल्लक होते. ६ मे रोजी निवडणुका पूर्ण झाल्यानंतर ही शिल्लक ७,६२७.२ कोटी रुपयांवर पोहोचली. म्हणजे या काळात पक्षाच्या खात्यातील शिल्लक तब्बल ९०४.६ कोटी रुपयांनी वाढली.

आसाम, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या तीन राज्यांमध्ये पक्षाने निवडणूक प्रचारासाठी एकूण सुमारे १६० कोटी रुपये खर्च केले. आसाममध्ये ९६.३ कोटी, तामिळनाडूत ५१.६ कोटी आणि पुद्दुचेरीत ११.९ कोटी रुपये खर्च झाल्याचे विवरणपत्रातून दिसते. केवळ सामान्य पक्षप्रचारावर या तीन राज्यांत १३०.४ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

ही आकडेवारी केवळ राजकीय पक्षाच्या आर्थिक ताकदीची नाही; ती देशातील राजकारण आणि सामान्य नागरिकाच्या आर्थिक स्थितीतील वाढत्या विषमतेचा आरसाही ठरते.

राजकीय पक्षांच्या तिजोरीत हजारो कोटी जमा होत असताना सामान्य कुटुंबाला घरभाडे, शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य, वीज आणि इंधनाच्या खर्चाचा ताळमेळ घालणे कठीण होत आहे. निवडणुकीत जाहिराती, प्रचारयंत्रणा आणि स्टार प्रचारकांच्या दौऱ्यांवर कोट्यवधी रुपये खर्च होतात; मात्र रोजच्या जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या नागरिकाच्या प्रश्नांना प्राधान्य किती?

राजकीय पक्ष श्रीमंत होत आहेत, पण सामान्य माणूस आर्थिकदृष्ट्या सुरक्षित होत आहे का? हा खरा प्रश्न आहे.

लोकशाहीत राजकीय पक्षांना देणग्या मिळणे कायदेशीर असू शकते; पण त्या पैशाचा स्रोत, पारदर्शकता आणि त्याबदल्यात निर्माण होणारा राजकीय प्रभाव याबाबत जनतेला स्पष्ट माहिती मिळणे तितकेच आवश्यक आहे.

एका बाजूला पक्षाच्या तिजोरीत पैशांचा पूर आणि दुसऱ्या बाजूला नागरिकाच्या घरातील खर्चाची कसरतया दोन भारतांमधील दरी किती वाढणार?

## सरकार निर्णय घेते, न्यायालय दिलासा देते; मग सामान्य माणसाने जायचे कुठे?

### अंगणवाडी सेविकांची वयोमर्यादा ५५ वरून ५० करण्याचा निर्णय हायकोर्टाने रद्द केला; सरकारी धोरणांना वारंवार न्यायालयाचा चाप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

सरकारने निर्णय घ्यायचा, नागरिकांनी तो सहन करायचा आणि अन्याय झाला तर न्यायालयाचा दरवाजा ठोठावायचाहीच का आपल्या प्रशासनाची नवी कार्यपद्धती? अंगणवाडी सेविकांच्या पदोन्नतीसाठीची कमाल वयोमर्यादा ५५ वरून ५० वर्षे करण्याचा राज्य सरकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केल्याने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सरकारच्या चुकीच्या निर्णयाचा फटका बसल्यानंतर न्याय मिळवण्यासाठीही सामान्य नागरिकांनी न्यायालयातच का धाव घ्यावी?

३ जुलै २०२६ रोजी राज्य सरकारने शासन निर्णय काढून पर्यवेक्षक पदावरील पदोन्नतीसाठी अंगणवाडी सेविकांची कमाल वयोमर्यादा ५० वर्षे केली. मात्र, यापूर्वीच्या धोरणानुसार ५५ वर्षांपर्यंतच्या सेविकांना पदोन्नतीसाठी पात्र मानले जात होते. अनेक वर्षे अस्तित्वात असलेल्या नियमावर विश्वास ठेवून सेवा बजावणाऱ्या महिलांच्या पदोन्नतीच्या संधीवर अचानक वयोमर्यादेची कुऱ्हाड चालवण्यात आली.

मात्र सरकारचा हा निर्णय न्यायालयात टिकला नाही. न्यायमूर्ती शर्मिला यू. देशमुख आणि न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांच्या खंडपीठाने शासन निर्णय रद्द करत ५५ वर्षांची जुनी वयोमर्यादा कायम ठेवली.

न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवताना दीर्घकाळ अस्तित्वात असलेल्या धोरणामुळे अंगणवाडी सेविकांच्या मनात ‘कायदेशीर अपेक्षा’ निर्माण झाली होती, असे स्पष्ट केले. त्यामुळे कोणतेही पुरेसे कारण न देता अचानक वयोमर्यादा कमी करणे योग्य नाही, असे न्यायालयाने म्हटले.

या निर्णयामुळे ५० ते ५५ वयोगटातील अंगणवाडी सेविकांना मोठा दिलासा मिळाला. पण या निर्णयाचा खरा धडा सरकारसाठी आहे. धोरण तयार करताना कायदेशीर बाबी, आधीच्या निर्णयांचा परिणाम आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या हिताचा विचार आधीच का केला जात नाही? सरकारच्या निर्णयाला न्यायालयाने रद्द केल्यानंतरच प्रशासनाला आपली चूक का लक्षात येते?

आज सामान्य नागरिकाला एखाद्या सरकारी निर्णयाविरोधात दाद मागायची असेल तर त्याच्याकडे दोनच पर्याय उरतातअन्याय सहन करणे किंवा न्यायालयाची पायरी चढणे. न्यायालयीन लढाई म्हणजे वेळ, पैसा, मानसिक त्रास आणि वर्षानुवर्षांचा पाठपुरावा. सरकारी निर्णय चुकीचा ठरला तर त्याची किंमत निर्णय घेणाऱ्या यंत्रणेने मोजण्याऐवजी सामान्य नागरिकाने का मोजावी?

अंगणवाडी सेविकांच्या प्रकरणात न्यायालयाने हस्तक्षेप केला म्हणून ५० ते ५५ वयोगटातील महिलांना दिलासा मिळाला. पण प्रत्येक सेविका न्यायालयात जाऊ शकते का? प्रत्येक कर्मचारी, शेतकरी, विद्यार्थी किंवा सामान्य नागरिकाला प्रत्येक चुकीच्या सरकारी निर्णयासाठी उच्च न्यायालय गाठणे शक्य आहे का?

सरकारने न्यायालयीन हस्तक्षेपाची वाट पाहण्याऐवजी निर्णय घेण्यापूर्वीच आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. प्रशासनाचा उद्देश नागरिकांना न्यायालयाच्या दारात उभे करणे नसून, त्यांना न्याय मिळेल अशी व्यवस्था उभी करणे हा असायला हवा.

शेवटी प्रश्न साधा आहेजर प्रत्येक छोट्या-मोठ्या अन्यायासाठी सामान्य माणसालाच न्यायालयात जावे लागत असेल, तर सरकारची उत्तरदायी आणि नागरिककेंद्रित प्रशासनव्यवस्था नेमकी कुठे आहे?

## संपादकीय

### विवादे नैव कर्तव्यं प्रधानैः सह कर्हिचित्

आपल्या पक्षाच्या काळात अतिरेक्यांच्या दहशतीमुळे लाल चौकात तिरंगा फडकवला जात नव्हता, याची जाणीव युवराज राहुल गांधींना नक्कीच असेल. पण मोदी सरकारमुळे काश्मीर खोरे दहशतवादमुक्त झाले आहे हे मान्य करण्याचा मोठेपणा राहुल गांधींना दाखवता आला नाही. चाणक्य नीतीतील हे अवतरण आहे. चाणक्य नीतीनुसार विनाकारण विरोध करणाऱ्या लोकांशी कधीही वाद घालू नये. त्यांच्याशी वाद घातल्याने तुमचा वेळ आणि मानसिक शांतता दोन्ही नष्ट होते. चाणक्य नीतीच्या या अवतरणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत अत्यंत निष्ठेने पालन केले आहे. गेल्या १२ वर्षांत त्यांच्यावर विरोधकांनी अभद्र, गलिच्छ अशा भाषांच्या सर्व प्रकारात टीका केली. पण असल्या टीकेला नरेंद्र मोदी यांनी कधीच भीक घातली नाही. विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी त्यांनी निर्धारपूर्वक वाटचाल सुरू आहे. मोदी सरकारच्या अलीकडील काही निर्णयांकडे दृष्टिक्षेप टाकला तर आपण समृद्ध राष्ट्र बनण्याच्या दिशेने कसे मार्गक्रमण करीत आहोत, याची कल्पना येऊ शकेल. रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी अहमदाबाद–मुंबई बुलेट ट्रेनच्या पाठोपाठ हैदराबाद–मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा केली. या प्रकल्पामुळे मुंबई–पुणे अंतर अवघ्या ५० मिनिटांत पार करता येणार आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात आल्यावर मुंबई–हैदराबाद प्रवास अवघ्या सव्वातीन तासांत पूर्ण होईल. सध्या या प्रवासाला किमान १० तास लागतात. २०१४ पूर्वी बुलेट ट्रेनसारख्या प्रकल्पांची भारतातील जनतेने कल्पनाही केली नव्हती. मुंबई–हैदराबाद बुलेट ट्रेनची माहिती देताना रेल्वे मंत्री वैष्णव यांनी मालवाहतुकीसाठी उभारण्यात आलेल्या पूर्व–पश्चिम स्वतंत्र रेल्वे मार्ग प्रकल्पाचे काम सुरू झाल्याची माहितीही दिली. स्वतंत्र रेल्वेमार्ग असल्याने औद्योगिक उत्पादने, शेतमाल तसेच अन्य वस्तूंची वाहतूक वेगाने होऊ शकणार आहे. सुरत–दानकुनी (पश्चिम बंगाल) असा २ हजार ५२ किलोमीटर लांबीचा हा मार्ग पश्चिम बंगाल, ओदिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या सहा राज्यांना जोडणारा आहे. हा फ्रिट कॉरिडॉर हा देशाच्या विकासाच्या वाटचालीतील अभिमानाचा प्रकल्प असणार आहे. राहुल गांधींसारखे विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कोंडीत पकडण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असताना, त्यासाठी कोणत्याही थराला जात असताना पंतप्रधान मोदी अत्यंत शांतपणे देशाच्या विकासाचे एक एक प्रकल्प मार्गी लावत आहेत. पंतप्रधानांनी अलीकडेच वीस स्पेस स्टार्टअप्सच्या सीईओ आणि संस्थापकांशी संवाद साधला. अंतराळ संशोधन क्षेत्र खासगी क्षेत्रासाठी खुले करण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. त्याचा फायदा घेत हैदराबाद येथील स्कायरूट एरोस्पेस या भारतीय खासगी अंतराळ कंपनीने विकसित केलेले विक्रम–१ या देशातील पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेटचे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून अलीकडेच यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपण झाले आहे. भारतीय तरुणांनी स्वतः तयार केलेल्या नव्या रॉकेटच्या साह्याने देशी–विदेशी उपग्रह अवकाशात उड्डाण घेणार आहेत. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) लडाखमधील न्योमा येथे जगातील सर्वात उंचावरील ड्रॉप झोनमध्ये 'मिलिटरी कॉम्बॅट पॅराशूट सिस्टीम'ची (एमसीपीएस) २२,००० फुटांवरून यशस्वी चाचणी घेतली आहे. अत्यंत प्रतिकूल हवामानात पार पडलेल्या या चाचणीमुळे भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय हवाईदलाने नुकताच न्योमा येथे लढाऊ विमानांच्या संचलनासाठी जगातील सर्वात उंचावरील हवाईतळ सुरू केला आहे. यापूर्वीही न्योमा येथे सैन्य, वाहने आणि युद्धसामग्री पॅरा–ड्रॉप करण्याच्या अनेक मोहिमा पार पडल्या आहेत. या सर्व घटना प्रत्येक भारतीयाची मान उंचावणाऱ्या ठरल्या आहेत. एकीकडे अशी घोडदौड चालू असताना देशाच्या अर्थव्यवस्थेने इराण–अमेरिका युद्धासारख्या अनेक संकटांवर मात करत, अडथळे दूर करत ७.०८ टक्क्यांचा विकास दर गाठला आहे. होर्मुझ खाडी बंद झाल्यामुळे देशाच्या इंधन पुरवठ्याची साखळी संकटात आली होती. इंधनाचे दर आकाशाला भिडण्याचा धोका होता. मात्र मोदी सरकारने आपले राजकीय आणि परराष्ट्र संबंधाचे कौशल्य पणाला लावल्यामुळे या संकटाचा देशाला कमीत कमी फटका बसला. अलीकडेच भारत–युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करार झाल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आणखी मजबूत होणार आहे. युरोपीय महासंघातले सर्व २७ देश या कराराच्या बाजूने आहेत आणि आवश्यक औपचारिक बाबी पूर्ण करून हा करार लवकरात लवकर अंमलात आणण्यास उत्सुक आहेत. सेमीकंडक्टर उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू असलेल्या भारताच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा होत आहे. सेमीकॉन इंडियाची पहिली आवृत्ती जगभरातील गुंतवणूकदारांच्या सहभागातून यशस्वी झाली होती, तर दुसरी आवृत्ती, सेमीकॉन इंडिया २.०, नुकतीच १४ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीसह सुरू करण्यात आली आहे. या संपूर्ण मोहिमेमुळे भारतातील सेमीकंडक्टर क्षेत्रात सुमारे ७० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीला चालना मिळेल. 'जंतरमंतर'वर गोंधळ घालण्यात धन्यता मानणाऱ्या, संसद बंद पाडण्यात पुरुषार्थ मानणाऱ्या राहुल गांधींना आपल्या देशाची ही प्रगतीमय वाटचाल ठाऊक नाही असे म्हणता येणार नाही. याच राहुल गांधींनी २९ जानेवारी २०२३ रोजी श्रीनगरच्या लाल चौकात जाऊन तेथे ध्वजारोहण केले होते. त्याची छायाचित्रेही प्रसिद्ध केली नव्हती. आपल्या पक्षाच्या काळात अतिरेक्यांच्या दहशतीमुळे लाल चौकात तिरंगा फडकवला जात नव्हता, याची जाणीव युवराज राहुल गांधींना नक्कीच असेल. पण मोदी सरकारमुळे काश्मीर खोरे दहशतवादमुक्त झाले आहे हे मान्य करण्याचा मोठेपणा राहुल गांधींना दाखवता आला नाही. अशा विरोधकांकडे दुर्लक्ष करीत देशाला प्रगतीची नवनवी शिखरे गाठून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मोठेपण आणखी उठून दिसते. विरोधकांच्या टीकेला उत्तर देत बसण्यापेक्षा आपल्या कृतीतून देशाची प्रगती साधण्याचा मार्ग त्यांनी पत्करला आहे.

# चाकण–निगडी मेट्रोत आळंदीला स्थानक द्या; इंद्रायणी प्रदूषण, पवना जलवाहिनीचा प्रश्न सोडवा

## दिशा समितीच्या बैठकीत महापौर रवि लांडगे यांचा केंद्राकडे पाठपुराव्याचा आग्रह

### पिंपरी–चिंचवडच्या पायाभूत सुविधा, वाहतूक, पाणीपुरवठा आणि पर्यावरणीय प्रश्नांवर महापौरांनी वेधले लक्ष



■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी–चिंचवड शहराच्या विकासाशी निगडित प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने समन्वयाने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी महापौर रवि लांडगे यांनी पुण्यात झालेल्या दिशा समितीच्या बैठकीत केली. चाकण–निगडी प्रस्तावित मेट्रो मार्गिकेत आळंदी स्थानकाचा समावेश, इंद्रायणी नदी प्रदूषणावर कालबद्ध कृती आराखडा आणि पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचा तिढा सोडविण्याच्या मागण्यांकडे त्यांनी विशेष लक्ष वेधले.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री तथा जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

**आळंदीला मेट्रो जोडण्याची मागणी**

प्रस्तावित चाकण–निगडी मेट्रो मार्गिकेत आळंदी स्थानकाचा समावेश करावा, अशी मागणी लांडगे यांनी केली. आळंदीचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व, भाविकांची मोठी संख्या आणि भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेता आळंदीला मेट्रो जोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भक्ती शक्ती–मुकाई चौक–वाकड–नाशिक फाटा–वल्लभनगर–चाकण अशी सुमारे ४५.२९ किलोमीटरची प्रस्तावित मार्गिका असून, त्यात ३४ स्थानकांचा प्रस्ताव आहे. या मार्गिकेचा विस्तार आळंदीपर्यंत करण्यासाठी आवश्यक परवानग्या आणि निधीसाठी केंद्र शासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**इंद्रायणी प्रदूषणावर केवळ बैठका नकोत**

इंद्रायणी नदीच्या वाढत्या प्रदूषणाचा प्रश्नही बैठकीत मांडण्यात आला. नदी प्रदूषण रोखण्यासाठी विविध यंत्रणांनी स्वतंत्रपणे कारवाई करण्याऐवजी सर्व संबंधित महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय विभागांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज लांडगे यांनी व्यक्त केली.

सांडपाणी प्रक्रिया, प्रदूषणाची कारणे निश्चित करणे, नदी संवर्धन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

**पवना जलवाहिनीचा तिढा सोडविण्याची मागणी**

पिंपरी–चिंचवडच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाचाही प्रश्न महापौरांनी उपस्थित केला. प्रकल्पाशी संबंधित प्रलंबित बाबींवर सर्व घटकांना विश्वासात घेऊन संयुक्त बैठक घेण्यात यावी आणि पुढील कार्यवाही निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय प्रधानमंत्री आवास योजना, अचठणढ २.०, स्मार्ट सिटी मिशन, पीएम स्वनिधी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, समग्र शिक्षा आणि राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम यांसारख्या केंद्र पुरस्कृत योजनांशी संबंधित प्रलंबित कामांना गती देण्याची मागणीही करण्यात आली.

महापौरांनी मांडलेल्या प्रश्नांवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या. शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी केंद्र व राज्य शासनाशी सातत्याने समन्वय ठेवून प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा केला जाईल, असे लांडगे यांनी यावेळी सांगितले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महापालिकेचे आवाहन

### 'श्रद्धा कायम, पर्यावरणाचीही काळजी घ्या'; शाडूच्या मूर्ती, कृत्रिम विसर्जनस्थळे आणि निर्माल्य संकलनावर भर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाचा उत्साह आणि भक्ती कायम ठेवतानाच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारावी, असे आवाहन पिंपरी–चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे. शाडू मातीच्या व नैसर्गिक रंगांच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट, स्वतंत्र निर्माल्य संकलन आणि कृत्रिम विसर्जनस्थळांचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

गणेशमूर्तीची खरेदी करताना नागरिकांनी शाडू मातीच्या तसेच नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. जलप्रदूषणाचा धोका लक्षात घेता पीओपीच्या मूर्तींचा वापर टाळावा. मूर्तींचे विसर्जन नदी, नाला किंवा तलावात न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम हौद अथवा जलकुंडातच करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, गणेशोत्सवाची परंपरा, श्रद्धा आणि उत्साह कायम ठेवतानाच पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांच्या सहभागातूनच स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहराचा संकल्प प्रत्यक्षात येईल.

**निर्माल्य नदीत नको**

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माण होणारे निर्माल्य जलस्रोतांमध्ये टाकू नये. त्यासाठी महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या निर्माल्य संकलन केंद्रांचा वापर करावा. ओला, सुका आणि विशेष काळजीचा कचरा स्वतंत्रपणे वर्गीकृत करून महापालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेकडे द्यावा.

**सजावटीतही पर्यावरणाचा विचार**

गणेश मंडप आणि घरगुती सजावटीसाठी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून नैसर्गिक आणि पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्युत रोषणाईसाठी आवश्यकतेनुसार एलईडी दिव्यांचा वापर करून ऊर्जाबचतीला प्राधान्य द्यावे. त्याचबरोबर ध्वनीविषयक नियमांचे काटेकोर पालन करून ध्वनी प्रदूषण टाळावे, असेही प्रशासनाने सांगितले आहे. उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, गणेशोत्सवात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. निर्माल्य व कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, महापालिकेच्या संकलन व्यवस्थेचा वापर आणि कृत्रिम विसर्जनस्थळांचा स्वीकार या छोट्या कृतींतून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साकार होऊ शकतो.

श्रद्धेचा उत्सव जलस्रोतांच्या प्रदूषणाचे कारण ठरू नये, यासाठी नागरिकांनी प्रशासनाच्या पर्यावरणपूरक उपाययोजनांना सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# काळेवाडीतील 'स्पॉट १८ मॉल'च्या गेटवर राडा

### व्यावसायिकावर लोखंडी डस्टबिन व दांडक्याने जीवघेणा हल्ला!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

काळेवाडी येथील प्रसिद्ध 'स्पॉट १८ मॉल'च्या गेटजवळ मध्यरात्री तुफान राडा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका व्यावसायिकावर आणि त्यांच्या मित्रावर लोखंडी डस्टबिन व लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला करण्यात आला. या मारहाणीत फिर्यादीच्या डोळ्याला व डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, हल्ल्यादरम्यान त्यांची ३ तोळ्यांची सोन्याची चेनही गहाळ झाली आहे.

नेमकी घटना काय?

अमरसिंग गुरमितसिंग अदियाल (वय ४४, धंदा – व्यवसाय, रा. जवळनगर, पिंपळे गुरव) हे ८ सप्टेंबरच्या मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास आपल्या मित्रासह स्पॉट १८ मॉलच्या गेटजवळ थांबले होते. त्यावेळी आरोपी परशुराम धोंजे (रा. गोखलेनगर, जनवडी, पुणे) आणि त्याच्या ३ साथीदारांनी संगनमत करून अमोल आणि त्यांच्या मित्रावर अचानक हल्ला चढवला.

आरोपींनी हातातील लाकडी दांडके आणि परिसरातील लोखंडी डस्टबिन उचलून दोघांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला गंभीर मार लागला असून मित्राच्या डाव्या डोळ्याला, छातीला व नाकाला जबर दुखापत झाली आहे. डोळ्याची जखम गंभीर असल्याचे समजते. याच गोंधळात फिर्यादीची गळ्यातील ३ तोळे वजनाची सोन्याची चेन गहाळ झाली. याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी आरोपी परशुराम धोंजे व त्याच्या ३ साथीदारांविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(२), ११८(१), ३२४(४), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक पाटील पुढील तपास करत आहेत.

**देहू–आळंदी रोडवर क्लिनरचा थरार; लाकडी दांडक्याने मारहाण करत ज्येष्ठ नागरिकाचा खांदा अन् खुबा निखळवला!**

**चिखली** : देहू–आळंदी रोडवर वजन काट्याजवळ ट्रकमध्ये बसलेल्या क्लिनरने एका ५६ वर्षीय व्यावसायिकावर लाकडी दांडक्याने अमानुष हल्ला केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या हल्ल्यात फिर्यादीचा उजवा खांदा आणि खुबा निखळला असून डोक्याला व पाठीला गंभीर दुखापत झाली आहे.

चिखली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेशकुमार मनोहर भिसे (वय ५६, रा. इंद्रप्रस्थ बंगला, निगडी प्राधिकरण) हे ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५:३० वाजता देहू–आळंदी रोडवरील रविरंजन वजन काट्याजवळील एम.व्ही. ट्रान्सपोर्टच्या ऑफिसमधून बाहेर पडत होते. त्यावेळी समोर उभ्या असलेल्या टाटा ट्रक (क्र. MH-14-EM-1168) मधील क्लिनर सीटवर बसलेला आरोपी महादेव पिराजे बलाडे (वय ३८, रा. बीड) याने कसलाही विचार न करता हातातील लाकडी दांडक्याने थेट भिसे यांच्या डाव्या कानावर आणि पाठीवर जोरदार प्रहार केले.

या अचानक झालेल्या हल्ल्यात भिसे यांचा उजवा खांदा आणि खुबा निखळला असून ते रक्तबंबाळ झाले. याप्रकरणी चिखली पोलिसांनी आरोपी महादेव बलाडे याच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

# पवना जलवाहिनीचा तिढा शेतकरी-शहर हिताच्या समन्वयातून सोडवा

### महापौर रवि लांडगे यांची जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे मागणी; मुख्यमंत्री स्तरावर संयुक्त बैठक घेण्याची सूचना


■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी–चिंचवडच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पवना जलवाहिनी प्रकल्पाचा प्रश्न केवळ प्रशासकीय पातळीवर न ठेवता मावळमधील शेतकरी, स्थानिक नागरिक आणि संबंधित सर्व घटकांना विश्वासात घेऊन सकारात्मक व सर्वमान्य तोडगा काढावा, अशी मागणी महापौर रवि लांडगे यांनी केली. या प्रकल्पातील प्रलंबित प्रश्नांवर अंतिम तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री स्तरावर संबंधित सर्व यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी विनंती त्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे केली.

दिशा समितीच्या बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले असता महापौर लांडगे यांनी जिल्हाधिकारी डुडी यांची भेट घेतली. यावेळी पवना जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात यापूर्वी झालेल्या बैठका, मावळमधील शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणी आणि प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा झाली.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज**

पवना जलवाहिनी प्रकल्प पुढे नेताना मावळमधील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांच्या अडचणींकडे संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. यापूर्वी



झालेल्या चर्चांमध्ये शेतकऱ्यांनी त्यांच्या विविध समस्या आणि अपेक्षा प्रशासनासमोर मांडल्या आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने संबंधित शेतकरी, स्थानिक नागरिक आणि सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून त्यांच्या प्रश्नांचा योग्य विचार करावा आणि त्यातून स्वीकारार्ह मार्ग काढावा, अशी भूमिका महापौरांनी मांडली.

दरम्यान, पिंपरी–चिंचवड शहराचा वाढता विस्तार आणि झपाट्याने वाढणारी लोकसंख्या पाहता भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी पवना जलवाहिनी प्रकल्प महत्त्वाचा असला, तरी शहराची पाण्याची गरज भागविताना मावळमधील शेतकऱ्यांच्या हिताचेही संरक्षण झाले पाहिजे, असे लांडगे यांनी स्पष्ट केले.

**मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेण्याची मागणी**

यापूर्वीच्या बैठकांमध्ये झालेल्या चर्चेनंतर आता निर्णयप्रक्रियेला गती देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभाग, जिल्हा प्रशासन, पिंपरी–चिंचवड महापालिका आणि इतर संबंधित यंत्रणांची संयुक्त बैठक घेण्यात यावी. या बैठकीत प्रलंबित मुद्द्यांवर एकत्रित चर्चा करून पुढील कार्यवाहीची स्पष्ट दिशा निश्चित करता येईल, असे महापौरांनी सांगितले.

शेतकऱ्यांचे हित आणि शहराची पाण्याची गरज यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. पवना जलवाहिनी प्रकल्प शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचा आहे; मात्र मावळमधील शेतकऱ्यांच्या अडचणी आणि अपेक्षांकडेही संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. कोणावरही अन्याय होणार नाही, अशा पद्धतीने सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊन सकारात्मक व सर्वमान्य तोडगा काढला पाहिजे. मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन विषयाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी चर्चा केली आहे. शहराची दीर्घकालीन पाण्याची गरज पूर्ण करतानाच शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

# जुन्या घराच्या वादातून साठ वर्षीय महिलेवर नातेवाईकांचा हल्ला; दहिरे–खराबवाडीत खळबळ

**म्हाळुंगे (खेड)** : जुन्या घराच्या वादातून स्वतःच्याच वृद्ध भावजय, तिची मुलगी, सून आणि नातीवर लाठीने जीवघेणा हल्ला करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार दहिरे–खराबवाडी (ता. खेड) येथे उघडकीस आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ सप्टेंबर रोजी रात्री ११:१५ च्या सुमारास धाडगे वस्ती येथे ही घटना घडली. फिर्यादी महिला (वय ६० वर्षे) या आपल्या घरात मुलगा, सून आणि नातवंडांसोबत असताना, जुन्या घराचा राग मनात धरून त्यांच्याच नात्यातील ओंकार लहु वाघुले, आकाश संतोष धाडगे आणि सागर साळू घोडे यांनी घरात घुसून लाठीने बेदम मारहाण केली. आरोपींनी घाणेरड्या शिव्या देत 'तुम्हाला जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली. म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरण: यवत पोलीस आणि एसआयटी पथकाची मोठी कारवाई; मुख्य आरोपीच्या पत्नीला अटक, आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**यवत । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील केडगाव येथील बहुचर्चित बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणात यवत पोलीस आणि विशेष तपास पथकाने (एसआयटी) अत्यंत मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी याच्या पत्नीला पोलिसांनी गुन्हात प्रत्यक्ष सहभाग असल्याच्या कारणावरून अटक केली आहे. यासोबतच या रॅकेटमधील अन्य तीन आरोपींचे जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले असून डॉक्टर मंदार माळीचा अटकपूर्व जामीनही नामंजूर करण्यात आला आहे.मोबाईल ॲपद्वारे रॅकेटचा पर्दाफाशकेडगाव परिसरात एका पोर्टेबल मशीन आणि अत्याधुनिक मोबाईल ॲपच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान केले जात असल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी उघडकीस आला होता. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार केवळ १२ वी पास असलेला अण्णासाहेब गिरी हा होता. तपासादरम्यान या काळ्या धंद्यात त्याच्या पत्नीचाही थेट सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी तिच्या मुसक्या आवळल्या आहेत.न्यायालयाकडून धक्का, पुढील तपास सुरूया गंभीर प्रकरणातील मुख्य संशयितांनी दाखल केलेले जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावले आहेत, ज्यामुळे आरोपींच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच या मशीन कुठून पुरवल्या गेल्या, याचा सखोल तपास यवत पोलिसांचे विशेष तपास पथक (एसआयटी) करत आहे.

# पीसीएमसीतील दोन बड्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी!

## मुख्यमंत्री फडणवीसांचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना आदेश; बांधकाम परवानगीतील 'दर' आणि फाइल अडवण्याच्या आरोपांनी खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी विभागातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागातील कथित कारभार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

बांधकाम परवानगी विभागातील सह शहर अभियंता सुनील भगवानी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्याविरोधात पिंपरी-चिंचवडचे माजी उपमहापौर तथा माजी नगरसेवक तुषार हिंगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे निर्देश दिल्याचे सांगण्यात येत आहे.

तक्रारीमध्ये बांधकाम परवानगी प्रक्रियेबाबत अत्यंत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. परवानगीसाठी सादर होणाऱ्या फाइल्स मध्ये जाणीवपूर्वक तांत्रिक त्रुटी, उणिवा किंवा अडचणी काढून त्या प्रलंबित ठेवल्या जातात, असा आरोप आहे. संबंधित फाइल पुढे नेण्यासाठी अर्जदारांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या



लागतात आणि या प्रक्रियेत आर्थिक व्यवहाराला वाव दिला जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः बांधकाम क्षेत्रात प्रति चौरस फुटामागे पाच ते सहा रुपयांपर्यंत अनधिकृत पैशांची मागणी केली जाते, असा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. ही कथित मागणी पूर्ण झाल्याशिवाय फाइल पुढे सरकत नाही, असा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे महापालिकेच्या परवानगी प्रक्रियेतील पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

विकास प्रकल्पांशी संबंधित जागांचा मूळ नकाशा किंवा रस्ता बदलणे, मंजूर आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करणे तसेच तांत्रिक कारणे पुढे करून बांधकाम व्यावसायिकांवर मानसिक आणि आर्थिक दबाव आणला जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नियम आणि तांत्रिक मंजुरीच्या नावाखाली नेमका किती 'खेळ' सुरू आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दोन्ही अधिकारी दीर्घकाळ एकाच पदावर कार्यरत असल्याने त्यांच्या भोवती कथित भ्रष्टाचाराचे जाळे निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांची तातडीने बदली करावी तसेच त्यांच्या ज्ञात-अज्ञात मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिल्याने आता महापालिका प्रशासन या आरोपांकडे कोणत्या गांभीर्याने पाहते, याकडे लक्ष लागले आहे. चौकशी निष्पक्ष झाली तर केवळ दोन अधिकाऱ्यांच्या भूमिकेपुरता हा विषय मर्यादित राहणार की बांधकाम परवानगी विभागातील संपूर्ण यंत्रणेची कार्यपद्धती तपासली जाणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आरोप सिद्ध होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवता येणार नाही. मात्र मुख्यमंत्री स्तरावर तक्रारीची दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले गेल्याने या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि दस्तऐवजाधारित चौकशी होणे अपेक्षित आहे. चौकशीत आरोप खरे ठरल्यास संबंधितांवर कठोर कारवाई होणार का, की हे प्रकरणही प्रशासकीय चौकशीच्या फेऱ्यात अडकणार, याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

## वर्षे सरली, आठवणी कायम! हिंदुस्थान अँटिबायोटिक्स शाळा २००३ बॅचच्या रियुनियनमध्ये रंगला गुरु-शिष्य स्नेहसोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

शाळा सुटली, वर्ग बदलले, प्रत्येक जण आपापल्या आयुष्यात रमला; मात्र शाळेच्या आठवणी आणि मैत्रीची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. याच जिव्हाळ्याचा अनुभव हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या २००३ इंग्लिश मीडियम बॅचच्या रियुनियनमध्ये आला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा हा स्नेहमेळावा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी श्री कृष्ण पॅलेस हॉटेल येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या आग्रहाला मान देत शिक्षक ॲड.आशुतोष रानडे, रमेश गाढवे, अनिथा कदम (स्टीवन मिस) आणि कविता गायकवाड, मुकेश पवार आवर्जून उपस्थित राहिले. अनेक वर्षांनंतर शिक्षक आणि विद्यार्थी पुन्हा एकत्र आल्याने वातावरण भावनिक झाले. शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला आणि मनोगत व्यक्त केले.

'गुरुंचे ऋण कधीही फेडता येत नाही' या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेने दिलेले शिक्षण, संस्कार आणि आयुष्याला दिशा देणारे मार्गदर्शन याबद्दल विद्यार्थ्यांनी विद्यालयाची तसेच शिक्षकांची मनापासून प्रशंसा केली.




कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयातील दिवंगत शिक्षक, कर्मचारी आणि दिवंगत माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत सर्वांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे श्लोक म्हणत आपल्या गुरुजनांना मानवंदना दिली.

रियुनियनच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे नियोजन केले होते. संगीत, मनोरंजन आणि हास्य-विनोदाने कार्यक्रमाला रंगत आणली. जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीने शालेय जीवनातील खोड्या, गमती-जमती आणि अविस्मरणीय प्रसंगांच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.

शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रपरिवाराने शाळेच्या आठवणींमध्ये रमून एकमेकांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले.

'शाळा म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत, तर आयुष्यभर सोबत राहणाऱ्या आठवणी, संस्कार आणि नाती आहेत,' याची प्रचिती या रियुनियनमधून आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमीन अझीझ आणि दिपाली दंदाडे यांनी केले आणि प्राजक्त घोरपडे यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांनी शिक्षक आणि विद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करत अशाच प्रकारे भविष्यातही स्नेहबंध कायम ठेवण्याचा संकल्प केला.तसेच सर्वांना आकर्षक भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या अविस्मरणीय रियुनियनचे आयोजन प्राजक्त घोरपडे, विक्रांत वर्मा, अमीन अझीझ,दिपाली दंदाडे, गझलनाझ अल्फोन्स यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे हिंदुस्तान अँटिबायोटिक स्कूलच्या २००३(इंग्रजी माध्यम) बॅचचा हा स्नेहमेळावा माजी विद्यार्थ्यांसाठी आठवणींच्या कप्प्यात कायमचा जपून ठेवावा असा ठरला.

## धनगर आरक्षणासाठी १७ सप्टेंबरला परभणीत महामोर्चाचा एल्गार

### 'हक्काच्या लढ्यात सोबत नसाल तर जागा दाखवू'; लोकप्रतिनिधींना धनगर समाजाचा थेट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**परभणी : प्रतिनिधी**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी येत्या १७ सप्टेंबर रोजी परभणी येथे भव्य 'आक्रोश' महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. धनगर समाजाचे नेते दीपक भाऊ बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर समाजबांधवांच्या बैठका सुरू असून, आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या महामोर्चाच्या नियोजनासंदर्भात धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील शिरस येथे नुकतीच समाजबांधवांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मोठ्या संख्येने समाजबांधवांनी सहभागी होऊन परभणीतील महामोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर चर्चेत आहे. आता १७ सप्टेंबरच्या महामोर्चाच्या माध्यमातून या मागणीला पुन्हा एकदा व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

दरम्यान, या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींना देण्यात आलेला इशारा विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. सरपंच, नगरसेवक, आमदार, खासदार आणि मंत्री अशा सर्व लोकप्रतिनिधींनी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या लढ्यात आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे.

ट्रान्सक्रिप्टनुसार, धनगर समाजाच्या या लढ्यात जे लोकप्रतिनिधी ठामपणे समाजाच्या मागणीच्या बाजूने उभे राहतील, त्यांना भविष्यात समाजाचा राजकीय पाठिंबा दिला जाईल. मात्र या हक्काच्या लढ्यात जे विरोधात राहतील किंवा सोबत येणार नाहीत, मग ते कोणत्याही जातीचे असोत किंवा स्वजातीचे असोत, त्यांना त्यांची जागा दाखवून दिली जाईल, असा आक्रमक इशारा देण्यात आला आहे.

त्यामुळे परभणीतील महामोर्चा हा केवळ आरक्षणाच्या मागणीपुरता मर्यादित राहणार की त्यातून आगामी राजकीय समीकरणांनाही नवी दिशा मिळणार, याकडे आता लक्ष लागले आहे. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांपासून विधानसभा आणि लोकसभा पातळीपर्यंतच्या लोकप्रतिनिधींवर या आंदोलनाचा राजकीय दबाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

'आरक्षणाच्या प्रश्नावर भूमिका घ्या, अन्यथा परिणामांना सामोरे जा', असा संदेश या आंदोलनातून देण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. त्यामुळे १७ सप्टेंबर रोजी परभणीमध्ये धनगर समाजाच्या किती मोठ्या संख्येने उपस्थिती होते आणि सरकारकडून या मागणीवर कोणती भूमिका घेतली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी महामोर्चा शांततेत आणि लोकशाही मार्गाने पार पाडण्याचे आवाहन केले असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आंबेगावच्या चार गुणवंतांचा जिल्हास्तरीय पुरस्काराने गौरव

### एक मुख्याध्यापक, दोन शिक्षक आणि एका शिक्षकेतर कर्मचाऱ्याची पुरस्कारासाठी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या चार गुणवंतांची पुणे जिल्हास्तरीय गुणवंत पुरस्कारासाठी निवड झाली आहे. यामध्ये एका मुख्याध्यापकासह दोन शिक्षक आणि एका शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा समावेश आहे. या निवडीमुळे आंबेगाव तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने दरवर्षी जिल्ह्यातील गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना जिल्हास्तरीय पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदाच्या पुरस्कारासाठी आंबेगाव तालुक्यातून चार गुणवंतांची निवड करण्यात आली आहे.

यामध्ये वनेश्वर माध्यमिक विद्यालय, तिरपाड येथील मुख्याध्यापक प्रकाश सखाराम इंदोरे यांची गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

तसेच श्री नवखंड माध्यमिक विद्यालय, पारगाव तर्फे खेड येथील उपशिक्षक ज्ञानदेव शिवाजी गाडगे आणि महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, मंचर येथील उपशिक्षिका स्मिता भागचंद बांगर यांची गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. शिक्षक पुरस्कारांपैकी एक पुरस्कार महिलेसाठी राखीव आहे.

जनता विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, घोडेगाव येथील वरिष्ठ लिपिक श्याम बापू वाघमारे यांची गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

या पुरस्कारांचे वितरण शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अण्णाभाऊ साठे सभागृह, पद्मावती, पुणे येथे होणार आहे. यावेळी आंबेगाव तालुक्यातील पुरस्कारप्राप्त गुणवंतांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. आंबेगाव तालुक्यातील चार गुणवंतांची जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी निवड झाल्याने शैक्षणिक क्षेत्रातून समाधान व्यक्त होत आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची आणि योगदानाची जिल्हास्तरावर दखल घेतली गेल्याने ही बाब संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची ठरली आहे. याबाबतची माहिती आंबेगाव तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील वळसे पाटील आणि सचिव अनिल देसले यांनी दिली.

# पुणे जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय

## 'प्रगती' प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मंजुरी; ७७२ पदांसह अत्याधुनिक यंत्रसामग्री व पायाभूत सुविधांना निधी : आमदार शंकर जगताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नागरिकांना अत्याधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास राज्य मंत्रिमंडळाने दि. ८ सप्टेंबर रोजी मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ७७२ पदांची निर्मिती, आधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री, आवश्यक पायाभूत सुविधा आणि निधी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असल्याची माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

जिल्हा रुग्णालयाची क्षमता वाढवून नागरिकांना माफक दरात अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला होता. रुग्णालयात आणखी ४०० खाटा वाढविण्याची आग्रही मागणी असून, त्यासाठीही शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे जगताप यांनी सांगितले.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक नागरिककेंद्रित करण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत 'प्रगती' आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांच्या या प्रकल्पातून जिल्हा रुग्णालयांना केवळ पायाभूत सुविधांच्या दृष्टीने सक्षम करण्याऐवजी त्यांना आधुनिक 'मल्टीस्पेशालिटी हब' म्हणून विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे.

या प्रकल्पांतर्गत आधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री, डिजिटल आरोग्य सुविधा, निदान सेवा आणि दर्जेदार उपचार व्यवस्था उभारण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि आजाराचे वेळेत निदान करून त्याची तीव्रता वाढण्यापूर्वी उपचार उपलब्ध करून देण्यावरही भर राहणार आहे. त्याचबरोबर अत्याधुनिक उपचार सर्वसामान्यांच्या आवाक्यात राहावेत, यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत.

गंभीर आजारांवरील उपचार जिल्ह्यातच

पुणे जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या २०० खाटांच्या सुपरस्पेशालिटी रुग्णालयामुळे हृदयरोग, कर्करोग, मेंदू व मज्जासंस्थेचे विकार, मूत्रपिंडविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचार अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. सध्या अनेक रुग्णांना महागड्या खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो किंवा उपचारासाठी दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. नवीन सुविधा कार्यान्वित झाल्यानंतर हा भार मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, 'प्रगती' प्रकल्पांतर्गत कोल्हापूर आणि नांदेड येथे ५०० खाटांची, तर नागपूर आणि लातूर येथे ३०० खाटांची जिल्हा रुग्णालये उभारण्याचे प्रस्तावित आहे. या पाच रुग्णालयांसाठी एकूण २ हजार ४३० पदे निर्माण करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

पुणे जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला असून, मंत्रिमंडळाचा हा निर्णय म्हणजे नागरिकांना दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे, असे आमदार शंकर जगताप यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी आरोग्य केंद्रात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला आता गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# आरक्षित पदं खुल्या प्रवर्गाला देण्याचा प्रस्ताव पण केंद्राकडेच आकडेवारी नाही!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

केंद्र सरकारच्या आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरक्षित पदे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना देण्यासाठी गेल्या सहा वर्षांत किती प्रस्ताव केंद्र सरकारकडे आले, याची तयार स्वरूपातील माहितीच उपलब्ध नसल्याचे कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

आरक्षित जागा पात्र आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांद्रे भरता न आल्यास त्या जागा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेला आरक्षणमुक्ती म्हटले जाते. मात्र या प्रक्रियेची संख्या, कारणे आणि त्यापूर्वी आरक्षित पदे भरण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न याबाबत केंद्र सरकारकडे एकत्रित आकडेवारी नसल्याची बाब समोर आली आहे.

कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, अशा प्रस्तावांची माहिती वेगवेगळ्या मंत्रालये आणि केंद्र सरकारच्या विविध विभागांमध्ये विखुरलेली आहे. त्यामुळे गेल्या सहा वर्षांतील सर्व प्रस्तावांची संख्या तात्काळ उपलब्ध करून देणे शक्य नसल्याचे विभागाचे म्हणणे आहे.

ही कबुली अशा वेळी आली आहे, जेव्हा राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने केंद्र सरकारच्या आरक्षणमुक्तीच्या प्रस्तावांवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. आयोगाच्या म्हणण्यानुसार, अनेक प्रस्ताव अपूर्ण असतात आणि आरक्षित पदे भरण्यासाठी पर्यायी प्रयत्न करण्यात आले होते की नाही, याची पुरेशी माहिती त्यामध्ये दिलेली नसते.

यामुळे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने अशा प्रस्तावांची स्वतंत्र चौकशी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आरक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, आरक्षित जागा प्रत्यक्षात का भरल्या जात नाहीत आणि त्या खुल्या प्रवर्गाकडे वळवण्यापूर्वी पुरेसे प्रयत्न झाले होते का, याची तपासणी करण्याचा आयोगाचा उद्देश आहे.

मात्र यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो आरक्षित पदे खुल्या प्रवर्गाला देण्याचा निर्णय घेतला जात असेल, तर त्याची पारदर्शक आणि केंद्रीकृत आकडेवारी सरकारकडे का नाही?

आता राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या चौकशीतून नेमकी कोणती माहिती समोर येते आणि केंद्र सरकार आरक्षणमुक्तीच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### 'तुला जिवंत सोडणार नाही' म्हणत तरुणावर चाकूने वार; मोबाईलसह सोनसाखळी लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : वृत्तसंस्था

कामावरून जेवणासाठी दुचाकीवरून निघालेल्या तरुणाला चौघांनी अडवून चाकूने हल्ला केला. हल्लेखोरांनी तरुणाचा मोबाइल आणि सोन्याची साखळी असा एकूण १ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज हिसकावून नेला. ही घटना सोमवारी (दि. ७) रात्री साडेआठच्या सुमारास पुण्याच्या उपविभागीय पोलिस अधिकारी (लोहमार्ग) यांच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर घडली.

याप्रकरणी अक्षय महादेव बोंबाळे (वय २८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विकी पात्रो, रॉकी पात्रो आणि त्यांच्या दोन अज्ञात साथीदारांविरुद्ध बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, बोंबाळे हे कामावरून जेवणासाठी दुचाकीवरून जात होते. त्या वेळी आरोपींनी त्यांना अडवले.

विकी दारू व गांजा पीत असल्याचे त्याच्या आईला सांगितल्याचा गैरसमज आरोपींच्या मनात होता. त्यातून आरोपींनी बोंबाळे यांना शिवीगाळ करून 'तुला आता जिवंत सोडणार नाही', अशी धमकी दिली. दोन अज्ञात साथीदारांनी त्यांचे हात-पाय पकडले. त्यानंतर विकीने धारदार चाकूने त्यांच्या गळ्यावर, तर रॉकीने छातीवर वार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हल्ल्यात बोंबाळे जखमी झाल्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडील २४ हजार रुपये किमतीचा वनप्लस मोबाइल आणि दीड लाख रुपये किमतीची दीड तोळ्याची सोन्याची साखळी हिसकावून पलायन केले. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ३०९(६), ३५१(२), ३५२, ३(५) तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियमाच्या कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बंडगार्डन पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अमोल धुमाळ करीत आहेत.

## समुद्राच्या अथांग जगात भारताची मोठी झेप! 'सागर मंथन'चे जलावतरण; खोल समुद्र संशोधनाला मिळणार नवी ताकद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी



कोलकाता : भारताच्या सागरी संशोधन आणि खोल समुद्रातील वैज्ञानिक मोहिमांना मोठी चालना देणारे स्वदेशी महासागर संशोधन जहाज 'सागर मंथन' बुधवारी, ९ सप्टेंबर २०२६ रोजी कोलकात्यात जलावतरण करण्यात आले. गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स (GRSE) कडून हे अत्याधुनिक संशोधन जहाज तयार करण्यात येत असून, ते नॅशनल सेंटर फॉर पोलर अँड ओशन रिसर्च (NCPOR) साठी बांधले जात आहे.

सुमारे ८४० कोटींच्या खर्चाचे हे जहाज भारताच्या समुद्रविज्ञान क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी क्षमतेचे प्रतीक मानले जात आहे. खोल समुद्रातील संशोधन, समुद्राच्या तळाचा अभ्यास, सागरी जैवविविधता, हवामान बदलाशी संबंधित संशोधन तसेच महासागरातील नैसर्गिक संसाधनांचा वैज्ञानिक अभ्यास यासाठी अशा जहाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

सरकारी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, 'सागर मंथन'चा वापर २०२८च्या सुरुवातीपर्यंत सुरू होण्याची अपेक्षा आहे. म्हणजेच पुढील काही वर्षांत भारतीय वैज्ञानिकांना महासागराच्या अधिक खोल आणि अद्याप पूर्णपणे न उलगडलेल्या भागांचा अभ्यास करण्यासाठी स्वदेशी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या जहाजाचे जलावतरण केवळ एका जहाजाची निर्मिती पूर्ण होण्याचा टप्पा नाही, तर भारताच्या 'ब्लू इकॉनॉमी', खोल समुद्रातील संशोधन आणि सागरी तंत्रज्ञानाच्या दिशेने वाढणाऱ्या क्षमतेचा महत्त्वाचा टप्पा आहे. विशेष म्हणजे, देशाच्या वैज्ञानिक आणि धोरणात्मक गरजांसाठी अत्याधुनिक संशोधन जहाज स्वदेशी पातळीवर उभारले जाणे हे 'आत्मनिर्भर भारत'च्या दृष्टीनेही महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## शाओमीच्या भारतातील कारभारावर गंभीर चौकशीची शिफारस! परदेशी गुंतवणूक कायद्याच्या पालनावर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली: : प्रतिनिधी

चीनची आघाडीची स्मार्टफोन कंपनी शाओमी पुन्हा एकदा भारतीय सरकारी यंत्रणांच्या चौकशीच्या केंद्रस्थानी आली आहे. भारताच्या गंभीर फसवणूक तपास कार्यालयाने शाओमीच्या भारतातील व्यवसाय पद्धती आणि परदेशी गुंतवणूक कायद्याच्या पालनाबाबत सविस्तर चौकशी करण्याची शिफारस केली आहे. ही माहिती एका सरकारी कागदपत्रातून समोर आली आहे.

शाओमीच्या व्यावसायिक व्यवहारांमध्ये कथित अनियमितता झाल्याचा संशय तपास यंत्रणेने व्यक्त केला आहे. विशेषतः कंपनीच्या व्यवसाय पद्धती, परदेशी गुंतवणुकीशी संबंधित नियमांचे पालन आणि निधीच्या हालचाली यांची बारकाईने तपासणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

शाओमीचा भारतातील व्यवसाय आधीच विविध सरकारी कारवाईंच्या भोवऱ्यात आहे. कंपनीला मालमत्ता गोठवण्याच्या कारवाईसह कराशी संबंधित मागण्या आणि परवाना शुल्काच्या देयकांशी संबंधित वादांना सामोरे जावे लागत आहे.

एकेकाळी भारतातील सर्वाधिक विक्री होणाऱ्या स्मार्टफोन कंपन्यांमध्ये आघाडीवर असलेल्या शाओमीचा बाजारातील हिस्सा मात्र आता कमी झाला आहे. ॲपल आणि सॅमसंगसारख्या कंपन्यांकडून वाढलेल्या स्पर्धेमुळे भारतीय बाजारपेठेतील शाओमीसमोरील आव्हान वाढले आहे.

या चौकशीच्या शिफारसीची वेळही महत्त्वाची मानली जात आहे. भारत आणि चीन यांच्यातील संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांना वेग येत असतानाच शाओमीविरोधातील ही शिफारस समोर आली आहे.

मात्र ही शिफारस म्हणजे अंतिम चौकशीचा आदेश नाही. केंद्र सरकारकडे या शिफारसीवर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. सरकार ती मान्य करू शकते, त्यावर पुढील कार्यवाही करू शकते किंवा कंपनीला मंजुरीही देऊ शकते.

आता प्रश्न असा आहे शाओमीच्या भारतातील व्यवहारांमध्ये नेमक्या कोणत्या अनियमितता झाल्याचा संशय आहे? निधीची हालचाल आणि परदेशी गुंतवणूक नियमांचे पालन यामध्ये नेमके काय आढळले?

या प्रश्नांची उत्तरे सविस्तर चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहेत. मात्र सध्याच्या घडीला शाओमीवरील सरकारी तपासणी आणखी तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## सौदीच्या तेल प्रकल्पांवर हुतींचा हल्ला; भारताचा तीव्र निषेध! पश्चिम आशियातील संघर्ष आणखी भडकण्याची भीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबियातील तेल प्रकल्पांवर झालेल्या हल्ल्याचा भारताने तीव्र निषेध केला आहे. मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ रोजी इराणसमर्थित हुती सशस्त्र गटाने सौदी अरेबियातील तेल प्रकल्पांसह काही नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. या हल्ल्यामुळे पश्चिम आशियातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची भीती निर्माण झाली आहे.

भारताने बुधवार, ९ सप्टेंबर रोजी या हल्ल्यांवर तीव्र चिंता व्यक्त करत, अशा प्रकारचे हल्ले प्रादेशिक सुरक्षेला आणि स्थैर्याला गंभीर धोका निर्माण करतात, असे स्पष्ट केले.

सौदी अरेबियाच्या तेल क्षेत्रावर झालेल्या या हल्ल्यामुळे जागतिक ऊर्जा बाजाराबाबतही



चिंता वाढली आहे. सौदी अरेबिया हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक असल्याने तेथील तेल उत्पादन, साठवणूक किंवा वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाल्यास त्याचे पडसाद आंतरराष्ट्रीय बाजारात उमटू शकतात.

इराणशी संबंधित असलेल्या हुती गटाने यापूर्वीही लाल समुद्र आणि परिसरातील विविध लक्ष्यांवर हल्ले केले आहेत. त्यामुळे या नव्या हल्ल्यामुळे पश्चिम आशियातील संघर्षाचा विस्तार आणखी मोठ्या क्षेत्रात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारतासाठी हा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. पश्चिम आशियात मोठ्या संख्येने भारतीय नागरिक वास्तव्यास असून, भारताच्या ऊर्जा गरजांसाठी आखाती देशांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. त्यामुळे या प्रदेशातील अस्थिरतेचा परिणाम भारतीय नागरिकांची सुरक्षितता, तेलाच्या किंमती आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

भारताने स्पष्ट केले आहे की हिंसाचार आणि हल्ल्यांमुळे प्रादेशिक सुरक्षेला बाधा पोहोचते. आता पश्चिम आशियातील संघर्ष आणखी कुठल्या दिशेने जातो, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेतर्फे शिक्षक कवी संमेलन उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले 'शिक्षक कवी संमेलन' रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी कवयित्री शांता शेळके सभागृह, निगडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमास महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य मा. पांडुरंग भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच बाबा भारती प्रतिष्ठानचे मा. महेंद्र भारती यांची विशेष उपस्थिती लाभली.

शिक्षकांच्या मनातील साहित्यिक आणि काव्यप्रतिभेला व्यासपीठ मिळावे, तसेच शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा गौरव व्हावा, या उद्देशाने या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

संमेलनात विविध शाळा व महाविद्यालयांतील शिक्षक कवी-कवयित्रींनी आपल्या कविता सादर करून उपस्थित रसिकांची दाद मिळवली. प्रतिमा काळे, विनिता




श्रीखंडे, रमाकांत श्रीखंडे, विदुला व्यवहारे, अशोक होनराव, उर्मिला व्यवहारे, शांताराम सोनार, जयश्री श्रीखंडे, गीता सुतार, प्राची देशपांडे, नरहरी वाघ, लक्ष्मीकांत अंतुर्लीकर, अनुप्रिया प्रभू, शीतल मच्छिंद्र करडे, श्रावणी फुलझलके, शहाजी वाघमारे, उज्ज्वल ढोणे, रुबी चटवाल, वर्षा मराठे, समिता टिल्लू, स्नेहा पाठक, जालिंदर राऊत आणि संजय जगताप यांनी आपल्या कविता सादर केल्या.

विविध सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक आणि समकालीन विषयांवरील कवितांनी कार्यक्रमात रंगत आणली. शिक्षकांच्या संवेदनशील मनातील विविध भावभावना आणि सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब त्यांच्या काव्य सादरीकरणातून उमटले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जालिंदर राऊत यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या ओघवत्या निवेदनामुळे संपूर्ण कार्यक्रमाला सुंदर साहित्यिक वातावरण लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष राजन लाखे, उपाध्यक्ष डॉ. रजनी शेठ व कार्यवाह संजय जगताप तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेच्या कार्यकारिणी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी कार्यवाह संजय जगताप यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थित मान्यवर, शिक्षक कवी-कवयित्री, साहित्यप्रेमी व रसिकांचे आभार मानले.

शिक्षक, साहित्यिक, साहित्यप्रेमी आणि रसिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभल्याने 'शिक्षक कवी संमेलन' संस्मरणीय ठरले.

## तीन भाषा धोरणावर केंद्राची कोंडी!

### 'इंग्रजी देशी भाषा नाही' म्हणत केंद्राचा आक्षेप; सहावीच्या विद्यार्थ्यांना २०३१च्या परीक्षेतून दिलासा मिळणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशाच्या शिक्षणव्यवस्थेत भाषेचा प्रश्न पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या दारात पोहोचला आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तीन भाषा धोरणाच्या अंमलबजावणीवर बुधवारी, ९ सप्टेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी झाली. या सुनावणीत केंद्र सरकारने इंग्रजीला देशी किंवा स्वदेशी भाषा मानण्याबाबत आक्षेप असल्याचे स्पष्ट केले. मात्र त्याचवेळी सध्या इयत्ता सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अनिवार्य तिसऱ्या भाषेच्या दहावीच्या मंडळ परीक्षेतून एकवेळचा दिलासा देण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले.

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. केंद्र सरकार आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने अतिरिक्त महान्यायवादी ऐश्वर्या भाटी यांच्या अनुपस्थितीत महान्यायवादी तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडली. इंग्रजीला स्वदेशी भाषा म्हणून मान्यता देण्याबाबत केंद्र सरकारला आक्षेप असल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले.

मात्र या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांचा.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तीन भाषा धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याची योजना आहे. इयत्ता सातवी ते नववीतील विद्यार्थ्यांना काही प्रमाणात सूट देण्यात आली आहे. मात्र सध्या इयत्ता सहावीत असलेल्या विद्यार्थ्यांना पुढे या धोरणाची पूर्ण अंमलबजावणी लागू होणार होती.

याचा थेट परिणाम त्यांच्या दहावीच्या मंडळ परीक्षेवर होणार आहे. सध्याच्या नियमानुसार या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीमध्ये तिसऱ्या भाषेची अनिवार्य मंडळ परीक्षा २०३१ मध्ये द्यावी लागू शकते.

आणि इथेच पालक, विद्यार्थी आणि शिक्षणव्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न उभा राहतो नियम बदलत असतील, तर त्याचा सर्वाधिक परिणाम सध्याच्या सहावीतील विद्यार्थ्यांवरच का?

भाषेचा विषय हा केवळ एका अतिरिक्त विषयाचा प्रश्न नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवाहात अचानक होणारा बदल, तिसरी भाषा शिकण्यासाठी लागणारा अतिरिक्त वेळ, प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता आणि देशातील वेगवेगळ्या राज्यांची भाषिक परिस्थितीया सर्वांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयानेही तीन भाषा धोरणाची अंमलबजावणी अखेरीस करावी लागेल, असे निरीक्षण नोंदवले. मात्र त्याचवेळी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने या धोरणाची अंमलबजावणी अधिक सुसूत्र आणि नियोजनबद्ध पद्धतीने करावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

केंद्र सरकारने सध्याच्या इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांना एकवेळची सूट देण्याबाबत तातडीने चर्चा करण्याचे आश्वासन दिले आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बैठक ९ किंवा १० सप्टेंबर २०२६ रोजीच घेण्याचे संकेत सरकारकडून देण्यात आले.

पण मोठा प्रश्न अजूनही कायम आहे तीन भाषा धोरण तयार करताना विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा पुरेसा विचार झाला होता का?

देशाची भाषिक विविधता जपण्यासाठी भाषा धोरण निश्चितच आवश्यक आहे. मात्र धोरणाची अंमलबजावणी अशी असायला हवी की विद्यार्थी आणि पालक हे सरकारी प्रयोगाचे साधन बनता कामा नयेत.

आता केंद्र सरकार नेमका कोणता निर्णय घेते, सध्याच्या सहावीतील विद्यार्थ्यांना २०३१च्या अनिवार्य तिसऱ्या भाषा मंडळ परीक्षेतून दिलासा मिळतो का, आणि इंग्रजीच्या स्थानाबाबत केंद्राची अंतिम भूमिका काय राहते याकडे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षणक्षेत्राचे लक्ष लागले आहे.